सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

## (महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग ६- अ करिता)

**क्र.पोमसं/४/१०(७)/लो.स.-२०२४-सपोनि.बदल्या/१३/२०२४,** मुंबई, दि.: - ३०/०१/२०२४

**वाचा :-** १. महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१,
२. मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.437/6/1/INST/ECI/ FUNCT/ MCC/2023, दि.२१/१२/२०२३,
३. या कार्यालयाचे क्र. पोमसं.३/ १०/६/निवडणूक आयोग-सूचना/१९०/२०२३, दि. ०३/०१/२०२४ व दि.०८/०१/२०२४ चे ज्ञापन
४. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. ३०/०१/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.

## -: आ दे श :-

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दि.२१/१२/२०२३ च्या पत्रान्वये आगामी लोकसभा निवडणूका मुक्त आणि स्वच्छ वातावरणात पार पाडण्याकरिता दिलेल्या मार्गदर्शक सूचना / निर्देशांनुसार सर्व पोलीस आयुक्त व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक या घटक प्रमुखांकडून बदलीपात्र नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची माहिती मागविण्यात आली. त्यानुसार सर्व संबंधीत घटक प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील माहितीची छाननी करुन छाननीअंती (अ) स्वग्राम जिल्ह्यात नेमणूकीस असलेले पोलीस अधिकारी व (ब) दि.३०/०६/२०२४ पर्यंत किंवा त्यापुर्वी मागील ०४ वर्षापैकी ०३ वर्षे कार्यकाल पूर्ण झालेले अधिकारी या निकषांप्रमाणे बदलीपात्र नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या याद्या तयार करण्यात आल्या. सदर याद्यांमधील नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने बदली संदर्भात विचारविनियम करुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न (२) मधील तरतुदींनुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रशासकीय निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणुन प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन, खालील नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी बदली करण्याचा पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी निर्णय घेतला आहे:-

| अ.क्र. | नि:शस्त्र सपोनि. यांचे नाव | सध्याची नेमणुक | नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | संतोष निवृत्ती शिंदे | नाशिक शहर | नाशिक परिक्षेत्र |
| २ | सोनुताई विजयराव झामरे | अमरावती शहर | नागपूर शहर |
| ३ | पुजा महादेवराव खांडेकर | अमरावती शहर | नागपूर शहर |
| ४ | अंकुश शिवाजी माने | सोलापूर शहर | नांदेड परिक्षेत्र |
| ५ | सुनिल जगन्नाथ अंकोलीकर | सोलापूर शहर | नाशिक शहर |

| अ.क्र. | नि:शस्त्र सपोनि. यांचे नाव | सध्याची नेमणुक | नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| ६ | वसंत हेमलू पवार | सोलापूर शहर | नाशिक शहर |
| ७ | विरेंद्र देविदास केदारे | अमरावती शहर | नागपूर परिक्षेत्र |
| ८ | रोहित माधव केदार | नाशिक शहर | ठाणे शहर |
| ९ | नानासो बाळु सावंत | सोलापूर शहर | औरंगाबाद परिक्षेत्र |
| १० | हेमंत बाळकृष्ण फड | नाशिक शहर | अमरावती शहर |
| ११ | ब्रम्हदेव मारुती देशमुख | सोलापूर शहर | अमरावती शहर |
| १२ | रोहित उत्तरेश्वर चौधरी | सोलापूर शहर | अमरावती परिक्षेत्र |
| १३ | शितल दिपकराव हिरोडे | अमरावती शहर | नागपूर शहर |
| १४ | सत्यवान रामदास भुयारकर | अमरावती शहर | नागपूर शहर |

20.01.24

**(के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

**प्रत,**

पोलीस आयुक्त, नागपूर शहर / ठाणे शहर / नाशिक शहर / अमरावती शहर / सोलापूर शहर

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परि. / नांदेड परि. / नागपूर परि. / औरंगाबाद परि. / अमरावती परि.

**२.** संबंधित घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक यांना तात्कांळ बजावून त्यांना विनाविलंब कार्यमुक्त करावे. तसेच, सदर बदली आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहीत स्वाक्षरी घ्यावी व ती पोच या कार्यालयास पाठवावी. बदली झालेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची वाट पाहू नये. तसेच, संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना पदग्रहण अवधी न उपभोगता तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर होण्याचे लेखी निर्देश देखील द्यावेत. संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केले नाही, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांवर राहील. त्याचप्रमाणे बदली आदेशाधीन नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही ते त्यांच्या बदलीच्या घटकात विहित वेळेत हजर झाले नाहीत, तर ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील.

**३.** सदर बदलीच्या आदेशामुळे ज्या जागा रिक्त राहणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांकडे तात्काळ सोपवावा.

**४.** बदलीवरील नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे अथवा मा.न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेवून पुढील कार्यवाही करावी.

**५.** ज्या ठिकाणी स्थानिक निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यमुक्त करावे.

**६.** बदलीवर हजर झालेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना घटकांतर्गत पदस्थापना देताना कार्यकारी पदात नेमणुक द्यावयाची असल्यास मुळ जिल्हयात नेमणुक देण्यात येऊ नये. तसेच, मा.केंद्रीय निवडणूक आयोगाने दि.२१/१२/२०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही, याची संबंधीत घटक प्रमुखांनी नोंद घ्यावी.

**७.** सदरचे आदेश घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात येत असून त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असल्यास तसे या कार्यालयास कळवून पुढील आदेशाची वाट पहावी.

८. बदली आदेशानंतर जे नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्णनिवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

९. बदली झालेले नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक बदली ठिकाणी हजर न झाल्यास त्यांच्या बदली आदेशात नेमणूक केलेल्या ठिकाणात अंशत: बदल करणे / बदली रद्द करणे / बदलीस स्थगिती देणे अशा विनंतीचा विचार केला जाणार नाही याची संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना लेखी सूचना द्यावी.

१०. उपरोक्त घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची नांवे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही अद्याप हजर झालेले नाहीत त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुध्द घटक प्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/५५०७/०६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध :- कार्यासन अधिकारी, का.क्र. ४ यांना ई-मेलद्वारे [desk4.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

**प्रत सविनय सादर,**

मा.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.

(लक्षवेध :- कक्ष अधिकारी, पोल-५ब)

महालेखाकार-०१, महाराष्ट्र राज्य, मुंबई / महालेखाकार-०२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

कार्यालय अधीक्षक, का. क्र. ३ / ९ / ११ / ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं., कार्यालय, मुंबई.

२/- यांनी सदरचे आदेश लोकसभा निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक यांचे बदली आदेश (Transfer order of Unamrmed Police for Loksabha - २०२४) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ०१ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.